**नि. फौ. खटला क्र.११५/२०२४**

**निशाणी क्र.२५**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०३ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : परमेश्वर पांडुरंग पांचाळ,

**वय** : ३५ वर्षे, **काम** : मोबाइल दुकान,

**राहणार** : कवठाळा, ता. देवणी, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी सर्व आरोपींना ओळखतो. ते आजरोजी न्यायालयामध्ये हजर आहेत. दि.२६/१०/२०२४ रोजी दुपारी २.३० वाजता माझा भाऊ मोहनेश्वर ला माझ्या आईचा कॉल आला आणि सांगितले की, तिन्ही आरोपींनी लाथाबुक्क्या घालून ट्रॅक्टर आडविला. सदर घटना आरोपी शिवाजीच्या कवठाळा येथील शेतामध्ये घडली होती. त्याप्रमाणे मी, माझा भाऊ मोहनेश्वर आणि दुकानातील कामगार आकाश मनोहर कलबुर्गे असे मिळून घटनास्थळी गेलो. तेथे सर्व आरोपींनी ट्रॅक्टर आडविला होता आणि माझे आईवडील तेथे होते. मोहनेश्वरने आरोपी शिवाजीला त्या अनुषंगाने विचारले असता त्यांनी माझ्या वाटणीस आलेली जमीन हालकी आहे असे म्हणून दगडाने मोहनेश्वरला मारले. त्यामुळे मोहनेश्वरला चक्कर आली आणि तो खाली पडला. त्यानंतर आरोपी ज्ञानेश्वरने मोहनेश्वरच्या पाठीवर धोंड्याने मारले. मी सोडवासोडव केली आणि मोहनेश्वरला दवाखान्यामध्ये घेऊन जात होतो त्यावेळी आरोपी शिवाजी आणि सुधाकर यांनी आम्हाला शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आम्ही पोलीस ठाणे देवणी येथे गेलो. पोलिसांनी आम्हाला पत्र दिले आणि सरकारी दवाखान्यामध्ये पाठविले. त्यानंतर डॉक्टरांनी पुढील उपचाराकरिता उदगीर येथे पाठविले होते. मी सांगितल्याप्रमाणे पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. आता मला वस्तूचिन्ह अ व ब वरील दोन दगड दाखविले. हे तेच आहेत.

सरतपास पूर्ण.

**:: आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. पाटील यांच्यामार्फत ::**

०२. माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले. आरोपी हे माझ्या भावकीतील आहेत. आकाश कलबुर्गे हा आमच्याकडे मागील तीन वर्षापासून कामाला आहे. लक्ष्मण देवंग्रे हा माझा मित्र आहे. आजरोजी आकाश कलबुर्गे माझ्यासोबत न्यायालयामध्ये आलेला आहे. माझ्या दुकानामध्ये एकुण सात लोक आहेत. माझ्या वडिलांच्या नावे सर्वे नं.५३/२ मध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला आरोपीच्या शेतातून सर्वे क्र.५३/२ मध्ये जावे लागते. परंतु गाव नकाशामध्ये सदर रस्ता नाही किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचा आरोपीसोबत रस्त्याच्या कारणावरून वाद आहे. माझ्या वडिलांनी रस्ता खुला करून मिळण्यासाठी तहसीलदार यांच्याकडे अर्ज केला आणि त्याबाबत चौकशी झाली होती आणि अर्ज दि.११/०४/२०२५ रोजी मंजूर झाला, हे मला माहिती नाही.

प्रश्न – तुम्हाला आरोपी शिवाजीच्या शेतामधून रस्ता नाही ?

उत्तर – आम्ही शेतात जायचे कसे.

०३. हे मला माहीत नाही की, आरोपी शिवाजीने मा. दिवाणी न्यायालय व. स्तर उदगीर येथे तहसीलदारांच्या आदेशाविरुध्द दावा केला आणि त्यामध्ये वडिलांनी म्हणणे दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला रस्ता न मिळाल्यामुळे आरोपीविरुध्द राग आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही बळजबरीने आरोपीच्या शेतामधून जातो. हे म्हणणे खरे आहे की, ऑक्टोबर महिन्यामध्ये सोयाबीन काढणीकरिता आणि रब्बीच्या पेरणीकरिता शेतामध्ये लोक असतात. सोयाबीनची रास ट्रॉलीमध्ये कोण भरली हे मला माहीत नाही. मी त्याबाबत माझ्या आईवडिलांकडे चौकशी केली नाही. माझ्या आईवडिलांनी ट्रॅक्टर भाड्याने घेतलेला होता. नमूद ट्रॅक्टरचा रंग, कंपनी व मालकी याबाबत मला माहिती नाही. ट्रॅक्टर चालकाबाबत मी चौकशी केली नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला देवणी येथे येताना वलांडी हे गाव ओलांडून यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, वलांडी येथे खाजगी दवाखाने उपलब्ध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वलांडी येथे पोलीस चौकी आहे. आम्ही पोलीस चौकी

वलांडी येथे नमूद घटनेची खबर दिली नाही. यापूर्वी पोलिसांनी मला नमूद दगड पोलीस ठाण्यामध्ये दाखविले होते. त्याची तारीख २८/०४/२०२४ रोजी आहे. परंतु त्याचा वेळ मला आठवत नाही. पोलिसांनी मला त्याबाबत नोटीस दिली नव्हती. साक्षीदार पुन्हा सांगतो की, पोलिसांनी मला फोन केला होता. घटनेनंतर माझी एकदाच पोलिसांशी पोलीस ठाण्यामध्ये भेट झाली.

०५. मी, मोहनेश्वर आणि आकाश असे मिळून पोलीस ठाण्यामध्ये गेलो होतो. मोहनेश्वरला सरकारी दवाखान्यामध्ये तपासले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.२६/१०/२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजताच्या दरम्यान मी, माझा भाऊ मोहनेश्वर आणि आईवडील यांनी शिवाजीला शेताच्या बांधावर मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मारहाणीमुळे शिवाजीच्या चार बरगड्या मोडल्या आणि फुफुसामध्ये पाणी साचले होते. शिवाजी हा पंधरा दिवस लातूर येथे दवाखान्यामध्ये भरती होता हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिवाजी आम्हाला त्याच्या शेतातून जाऊ नसल्याने आम्ही त्यास मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पैशाच्या जोरावर शिवाजीची तक्रार नोंदवू दिली नाही आणि आमच्यावर कारवाई करू दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही, मारहाण झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही संगनमताने रस्ता मिळविण्यासाठी खोटी कार्यवाही केली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.
दि.०४/०६/२०२६.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.